ग्राम पंचायत निवडणूकीसाठी उमेदारांना ऑफलाईन अर्ज सादर करता येणार

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांचे फलीत, राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय

ग्राम पंचायत निवडणूकीसाठी उमेदारांना ऑफलाईन अर्ज सादर करण्याची परवानगी देण्याची मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्य निवडणूक अधिकारी श्री. मदान यांच्याकडे केली होती. सदर मागणीला त्वरीत सकारात्मक प्रतिसाद देत राज्य निवडणूक आयोगाने नामनिर्देशन पत्र पारंपरिक पध्दतीने अर्थात ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत निवडणूक आयोगाने दिनांक 29 डिसेंबर रोजी निर्देश पत्र राज्यातील सर्व जिल्हाधिका-यांसाठी निर्गमित केले आहे.

बीएसएनएल च्या नेटवर्क मधील अनियमिततेमुळे उमेदारांना त्रास सहन करावा लागत आहे. अतिशय मंदगतीने इंटरनेट चालु असल्याने उमेदवार त्रस्त झाले आहेत. लोकशाहीमध्ये ज्या निवडणूकीला गावपातळीवरील विधानसभा म्हटले जाते अशा ग्राम पंचायत निवडणूकीमध्ये उमेदारांना अर्ज भरण्याच्या प्रक्रियेतच गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. राज्यातील इतरही जिल्हयांमध्ये ही समस्या उमेदारांना सहन करावी लागत आहे, याकडे आ. मुनगंटीवार यांनी श्री. मदान यांचे लक्ष्य वेधले. श्री. मदान यांनी याबाबत त्वरीत कार्यवाही करण्याचे आश्वासन सुध्दा दिले होते. राज्य निवडणूक आयोगाने याबाबत त्वरीत निर्णय घेतला असून 29 डिसेंबर रोजी सर्व जिल्हाधिका-यांना पत्राद्वारे निर्देश दिले आहेत. त्याचप्रमाणे नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची वेळ सुध्दा 30 डिसेंबर रोजी सायंकाळपर्यंत वाढविण्यात आली आहे.

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २९ डिसेंबर, २०२०

प्रति,
जिल्हाधिकारी(सर्व)
मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून

**विषय:-** माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूक
पारंपारिक पध्दतीने ( offline mode )नामनिर्देशनपत्र स्वीकारणेबाबत

**संदर्भ:-** राज्य निवडणूक आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक ११/१२/२०२० आदेशान्वये दिलेला निवडणूक कार्यक्रम

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के आणि २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

आयोगाने संदर्भ क्र.१ येथील दि.११/१२/२०२० रोजीच्या आदेशान्वये माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम दिलेला आहे. या कार्यक्रमानुसार संगणकप्रणालीव्दारे नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा कालावधी दिनांक २३/१२/२०२० ते दिनांक ३०/१२/२०२० असा आहे. या कालावधीत संगणकप्रणालीव्दारे एकूण ३,३२,८४४ इतके नामनिर्देशनपत्र दाखल झाले आहेत.

मात्र नामनिर्देशनपत्र दाखल करताना दिनांक २८/१२/२०२० रोजी सायंकाळपासून काही तांत्रिक अडचणी जसे इंटरनेट गती कमी, सर्व्हर अडचण इ. तक्रारी आयोगाकडे प्राप्त होत आहेत. सदर बाब विचारात घेता, इच्छूक उमेदवार नामनिर्देशनापासून वंचित राहून नये आणि त्यांना निवडणूक लढविण्याची संधी मिळावी म्हणून आयोगाने नामनिर्देशनपत्र पारंपारिक पध्दतीने (offline mode)स्वीकारण्याचा तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची वेळदेखील दिनांक ३०/१२/२०२० रोजी सायंकाळी ५.३० वा. पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

तरी वरील निर्णयाच्या अनुषंगाने सर्व निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधितांना तातडीने पारंपारिक पध्दतीने नामनिर्देशनपत्र स्वीकारणे व वाढीव वेळेच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच नामनिर्देशनपत्र व